**फिलीपिन्सचे राष्ट्राध्यक्ष महामहीम फर्डिनांड मार्कोस ज्युनियर औपचारिक भारत भेटीवर (04-08 ऑगस्ट 2025)**

31 जुलै 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरुन  फिलीपन्सचे राष्ट्राध्यक्ष महामहिम श्री. फर्डिनांड मार्कोस ज्युनियर हे औपचारिक भारत भेटीवर येणार आहेत. 04-08 ऑगस्ट 2025 दरम्यान ही भेट प्रस्तावित असेल.  त्यांच्या समवेत फर्स्ट लेडी मॅडम लुईस अरानेटा मार्कोस आणि अनेक कॅबिनेट मंत्री, अन्य मान्यवर आणि वरिष्ठ अधिकारी, व्यावसायिक प्रतिनिधींसह एक उच्चस्तरीय शिष्टमंडळ असेल.  08 ऑगस्ट 2025 रोजी फिलिपिन्सला रवाना होण्यापूर्वी राष्ट्राध्यक्ष हे बंगळुरुला भेट देतील.

2. फिलीपिन्सच्या राष्ट्राध्यक्ष पदाची धूरा स्विकारल्यानंतर राष्ट्राध्यक्ष मार्कोस यांची पहिलीच भारत भेट असेल.  प्रस्तावित भेटीदरम्यान, पंतप्रधान आणि राष्ट्राध्यक्ष मार्कोस यांमध्ये 05 ऑगस्ट 2025 रोजी द्विपक्षीय चर्चा देखील पार पडणार आहे.  राष्ट्राध्यक्ष मार्कोस हे आदरणीय राष्ट्रपती श्रीमती. द्रौपदी मुर्मू यांची सोबत देखील भेट घेतील.  परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर हे देखील या भेटीदरम्यान राष्ट्राध्यक्ष मार्कोस यांची भेट घेणार आहेत.

3. भारत आणि फिलिपिन्स यांच्या दरम्यान नोव्हेंबर 1949 मध्ये राजनयिक संबंध प्रस्थापित झाले होते. उभय देशांनी आजवर व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा, सागरी सहकार्य, कृषी, आरोग्यसेवा, औषधनिर्माण आणि डिजिटल तंत्रज्ञानासह विविध क्षेत्रांमध्ये दृढ भागीदारी विकसित केली आहे.  उभय देशांचे प्रादेशिक स्तरावरही निकटतम सहकार्य राहिलं आहे. ज्यामध्ये भारताच्या आसियान सह सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी समाविष्ट आहे.

4. फिलिपिन्स सोबतचे भारताचे संबंध हे 'ॲक्ट ईस्ट' धोरण, व्हिजन महासागर आणि इंडो-पॅसिफिकचे व्हिजन यांचा अविभाज्य घटक आहे.  राष्ट्राध्यक्ष मार्कोस यांच्या आगामी अधिकृत दौऱ्याला भारत-फिलिपिन्स राजनयिक संबंध प्रस्थापनेच्या 75 व्या वर्षपूर्तीची पार्श्वभूमी असेल.  ही भेट उभय नेत्यांसाठी भविष्यातील द्विपक्षीय सहकार्याचा मार्ग निश्चित करण्याची आणि परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करण्याची संधी आहे.

**नवी दिल्ली**

31 जुलै 2025